# मुंबई विमानतळाच्या टर्मिनल २ मेट्रो स्थानकावर असणार सर्वात उंच एस्कलेटर

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या भुयारी स्थानकापैकी टर्मिनल २ स्थानकावर भारतातील सर्वात उंच एस्कलेटर उभारण्यात आले आहेत.

टर्मिनल २ मेट्रो स्थानकामध्ये १९.१५ मीटर उंचीचे आठ एस्कलेटर बसवण्यात येत आहेत. याआधी भारतातील मागील सर्वात उंच एस्कलेटर दिल्ली मेट्रो अंतर्गत जनकपुरी पश्चिम मेट्रो स्टेशनवर असून त्याची उंची १५.६ मीटर आहे. 'आठ एस्कलेटरपैकी चार आधीच उभारले गेले आहेत आणि उर्वरित बसवण्याचे काम सुरू आहे.



या एस्कलेटरच्या उभारणीच्या कामासाठी २५० टन क्रेनचा वापर करण्यात आल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)ने दिली आहे.

मुंबईच्या गजबजलेल्या महानगराच्या मध्यभागी बांधकाम सुरू असताना आकारमानाने मोठी आणि जड असणाऱ्या उपकरणांच्या वाहतुकीसाठी फक्त रात्रीची वेळ निवडण्यात आली होती. मर्यादित ओपनिंग किंवा कटआऊट स्पेस वापरून भूमिगत स्थानकांमध्ये एस्कलेटर दाखल करणे हे आव्हानात्मक होते. अभियांत्रिकीनुसार, योग्य क्रेनची निवड, नियोजन क्रम आणि सिव्हिल वर्कसह अभियांत्रिकी समन्वय ही इतर आव्हाने लिलाया पेलल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.